महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरूवार ■ 06 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 249 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024






### नववर्ष स्वागतयात्रेच्या

## स्वागताध्यक्षपदी शरद गांगल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास आयोजित यंदाच्या रौप्य महोत्सवी वर्षातील हिंदु नववर्ष स्वागतयात्रेचे स्वागताध्यक्ष म्हणून टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. सोमवारी श्री कौपिनेश्वर मंदिर सभागृहात आयोजित बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यासाच्या वतीने हिंदु नववर्षानिमित्त ३० मार्च रोजी स्वागतयात्रा काढण्यात येणार आहे. स्वागतयात्रेचे यंदाचे २५ वे वर्ष असल्याने या स्वागतयात्रेला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. यात्रेच्या नियोजनासाठी सोमवार ३ मार्च रोजी पार पडलेल्या बैठकीत टीजेएसबीचे शरद गांगल यांची स्वागताध्यक्ष म्हणुन घोषणा करण्यात आली. या बैठकीला न्यासाचे अध्यक्ष उत्तम जोशी, कार्याध्यक्ष संजीव ब्रह्मे, कार्यवाह डॉ.अश्विनी बापट, निमंत्रक तनय दांडेकर, पितांबरीचे रविंद्र प्रभुदेसाई, सुहृदयी उद्योजक एसएमसीचे सुहास मेहता यांच्यासह विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वांनी गांगल यांचे अभिनंदन केले.

## सिव्हील रुग्णालयात जन्मले तिळे बाळ



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे: सिव्हिल रुग्णालयातील अद्ययावत प्रसूतीगृहात अत्यंत जोखमीच्या प्रसूती पार पडत असून, नुकतेच एका महिलेने तीन बाळांना जन्म दिला आहे. आई आणि तिन्ही बाळं सुखरूप असून मंगळवारी त्यांना घरी पाठवण्यात आले. ठाणे जिल्ह्यात बाळंतपणासाठी सिव्हील रुग्णालयातील प्रसूतीगृह आई आणि बाळासाठी वरदान ठरत आहे. रुग्णालयातील प्रसूतीगृह अद्ययावत असून, प्रसूतीसाठी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून महिला उपचारासाठी येत आहेत. प्रसूतीगृहात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसूतीगृहात एका महिलेने तीन बाळांना जन्म दिला असल्याची माहिती बालरोग तज्ज्ञ डॉ. सुरेश वानखेडे यांनी दिली.

मुंब्र्यात रहाणाऱ्या एका २० वर्षीय महिलेला १८ फेब्रुवारी रोजी प्रसूतीगृहात महिलेची सिझरींगनंतर तीन बाळांना जन्म दिला आहे. यामध्ये दोन मुलगे आणि एक मुलगी आहे. बाळांची प्रकृती उत्तम असून. वजन अनुक्रमे पहिले एक किलो ६०० ग्रॅम, दुसरे एक किलो ८०० तर एक किलो ५०० ग्रॅम आहे. त्यांच्या आईची प्रकृती ठणठणीत आहे. रुग्णालयात केलेल्या योग्य उपचारानंतर आई आणि बाळांना मंगळवारी घरी पाठवण्यात आले. प्रसूतीच्या वेळी बाल रोग तज्ज्ञ डॉ. सुरेश वानखेडे, स्त्री-रोग तज्ज्ञ डॉ. श्रेया शेळके, भुलतज्ज्ञ डॉ. प्रियांका महांगडे, डॉ. रुपाली यादव, डॉ. प्रकाश बोरुळकर, डॉ. शैलेश गोपनपल्लीकर, डॉ. राहुल गुरव, डॉ. सिद्धार्थ शहा ,एसएनसीयू परिचारिका सारिका शेणेकर, शीतल जठार आदी कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# नदीकाठची गावे, तहानलेलीच

## शहापूर तालुक्यातील भीषण वास्तवता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : शहापूर तालुक्यातील आदिवाली, वेहळोली,खराडे तसेच मुरबाड तालुक्यातील खांडपे व पाडाळे या धरणांचे पाणी सोडणे सध्या बंद केले आहे.यामुळे काळू नदी काठच्या गावांच्या नळ पाणीपुरवठा योजनांचा पाण्याचा स्रोत बंद झाल्याने या गावातील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.दरम्यान गावांमधील पाणी टंचाई लक्षात घेता सदर धरणांमधील पाणी सोडण्यासंदर्भात शहापूर गटविकास अधिकारी यांनी मुरबाड व शहापूर येथील पाटबंधारे विभागाला कळविले आहे.

तालुक्यातील नांदवल, गेगाव,शीळ, शेलवली (बां),कळगाव, ठिले व शेंद्रूण आदी ग्रामपंचायतींमध्ये भिषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे.या ग्रामपंचायत हद्दीमध्ये नळ पाणी पुरवठा योजना आहेत.मात्र धरणांचे पाणी सोडणे बंद केले असल्याने काळू नदी पात्र कोरडे ठाक पडले आहे.किंबहुना या गावांमधील असलेल्या पाणी योजनांचा पाण्याचा स्रोत बंद झाला आहे.याबाबत नांदवल, गेगाव, शेंद्रूण, शील, शेलवली (बां),कळगाव,ठिले या गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली असल्याने सदर ग्रामपंचायतींनी शहापूर पंचायत समिती पाणी पुरवठा विभागाकडे टँकरची मागणी केली असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र खारीक यांनी दिली.दरम्यान पाणी टंचाई अकार्यक्षम शेती पद्धती आणि भूजलाच्या बेसुमार उपसा कारणीभूत ठरत आहे.त्यामुळे महत्त्वाचे जलस्रोत कमी झाले आहेत.किंबहुना हवामान बदलामुळे परिस्थिती आणखी बिकट होत आहे.ज्यामुळे अनियमित पर्जन्यमान होते.तसेच खराब पाणी व्यवस्थापन आणि योग्य पायाभूत सुविधांचा अभाव देखील संकट वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.ज्यांच्या बोरिंगला मुबलक पाणी आहे ते कारण नसतांनाही पाण्याचा उपसा करत असतात.तसेच भाजीपाल्यासाठी पाणी घेतांना कोणतेही मोजमाप नसते. संपूर्ण रात्र आणि दिवसा नदी पात्रातील पाण्याचा उपसा सुरु असल्याचे वास्तव चित्र दिसून येत आहे.



> नांदवाल, गेगाव, शेलवली गावातील पाणी पुरवठा योजनेचा उद्धव काळू नदीच्या पत्रातून आहे.मात्र या नदीत खांडपे व पाडाळे धरणातून सोडले जाणारे पाणी बंद केल्याने पाण्याचा स्रोत बंद झाल्यामुळे नदी लगत असणाऱ्या गावांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.
> - विठ्ठल डोंगरे, ग्रामपंचायत सदस्य.

**पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोनाची आवश्यकता आहे.पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पाणलोट व्यवस्थापन यासारख्या कार्यक्षम पाणी व्यवस्थापन पद्धती अंमलात आणल्याने पाण्याचे स्रोत पुन्हा भरुन निघू शकतात.गाव पातळीपासून रेन हार्वेस्टिंगसारखे प्रकल्प राबवणे.तसेच नदी, नाले, ओहळ यांचे पात्र गाळाने भरले असल्याने पाणी साठाण्यास अडथळा निर्माण होतो.तसेच जनतेमध्ये पाणी संवर्धनाबद्दल जागरुकता वाढवणे आणि पाण्याच्या वापराला प्रोत्साहन देणे अत्यंत महत्वाचे आहे. याव्यतिरिक्त, दीर्घकालीन उपायांसाठी शाश्वत पाणी वाटप आणि व्यवस्थापनाला प्रोत्साहन देणारी धोरणे आवश्यक आहेत.**



## छत्रपती शिवाजी महाराजांच्या थीम पार्कचा कालबद्ध कार्यक्रम घोषित करा – दरेकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** - राज्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे थीम पार्क संग्रहालय उभारण्यात येणार आहे. या थीम पार्क संग्रहालयाचा कालबद्ध कार्यक्रम शासनाने घोषित करावा, अशी विनंती भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी आज विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला केली. छत्रपती शिवाजी महाराजांप्रती सरकार अनेक ठिकाणी स्मृती भवने, थीम पार्क उभारत आहे. त्याचा कालबद्ध कार्यक्रम सरकारने घोषित करावा. जिजाऊंच्या पाचाड येथील वाड्याच्या कामाचाही कालबद्ध कार्यक्रम जाहीर करुन ते काम पूर्ण करावे. राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी रायगड किल्ल्यासाठी प्राधिकरण तयार केले आहे, त्याचेही काम प्रगतीपथावर आहे. ही शिवसृष्टी झाली तर आणखी पर्यटक मोठ्या प्रमाणावर येतील व आपल्या राजांचा इतिहास सर्वदूर जाईल. त्यामुळे यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करावा, अशी विनंती दरेकर यांनी सभागृहात केली. या प्रश्नाला सरकारतर्फे उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई म्हणाले कि, रायगड संवर्धन प्राधिकरण हे श्रीमंत छत्रपती संभाजीराजे कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केले आहे. त्या प्राधिकरणाच्या माध्यमातून रायगड किल्ल्यावर वेगळ्या पद्धतीचे संवर्धनाचे काम सुरू आहे. सन्माननीय सदस्य प्रविण दरेकरांनी उल्लेख केला ती जागा पाचाड येथे आहे. जिथे राजमाता जिजाऊंचा वाडा होता, जिजाऊंनी तेथेच देह ठेवला. तो पाचाडचा वाडा शिवकाळात जसा होता तसाच करण्याचे नियोजन आहे. ती जागा पुरातन खात्याच्या अखत्यारीत येत नाही. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यात आहे. त्यामुळे ३०० वर्षांपूर्वीचा वाडा उभा करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्याला प्रथम प्राधान्य या वर्षाच्या पर्यटन विभागाच्या आराखड्यात दिले जाईल.

# रेल्वेकडून भिवंडीच्या खासदारांची दिशाभूल

## आश्वासन देऊनही वांगणी स्टेशनवरील कामे प्रलंबित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वांगणी** : वनिगरगट्ट रेल्वे प्रशासनाच्या मनमानी कारभाराचा उत्तम नमुना वांगणी स्टेशनमध्ये पाहायला मिळतोय. याठिकाणी रेल्वे प्रशासनाने खासदार बाळयामामा म्हात्रे यांना लेखी उत्तर देऊनही लिफ्टचं काम पूर्ण केलेलं नाही. 28 फेब्रुवारीपर्यंत वांगणी रेल्वे स्थानकातील लिफ्ट सुरू होईल असं आश्वासन रेल्वेकडून देण्यात आलं होतं. संतापजनक बाब म्हणजे रेल्वेनं याठिकाणी लिफ्टचं कामच सुरू केलेलं नाही.

वांगणी रेल्वे स्थानकावरून दररोज शेकडो प्रवासी प्रवास करतात. वांगणी रेल्वे स्थानकावर पश्चिमेला अडीच वर्षापूर्वी लिफ्ट उभारण्याचं काम सुरू करणयात आलं. एका वर्षानंतर हे काम अचानक बंद करण्यात आलं. काम पूर्ण व्हावं यासाठी वांगणी रेल्वे प्रवासी संघटनेनं 29 डिसेंबर 2024 रोजी खा. बाळयामामा म्हात्रे यांना पत्र दिलं. लिफ्टसोबत 4 वर्षापूर्वी मंजुरी मिळालेल्या सरकत्या जिन्याचं काम तात्काळ पूर्ण करावे अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली. त्यानंतर 1 जानेवारी 2025 रोजी खा.बाळयामामा यांनी मध्य रेल्वेच्या DRMना पत्र पाठवून सदर काम त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना केल्या. यावर 5 फेब्रुवारी 2025 रोजी मुंबई विभागाचे ADRM शशी भूषण यांनी वांगणी रेल्वे स्थानकावरील लिफ्टचं काम 28 फेब्रुवारी 2025 पर्यंत पूर्ण होईल तसंच सरकत्या जिन्याचं काम 31 मार्च 2025 पर्यन्त पूर्ण होईल असं उत्तर पत्राद्वारे दिलं.



मात्र प्रत्यक्षात लिफ्ट आणि सरकत्या जिन्याचं कोणतंही काम सुरूच झालं नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. उद्दाम रेल्वे प्रशासनानं खासदारांची फसवणूक केल्याचा आरोप रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष मनोहर शेलार यांनी केलाय. तसच प्रवासांच्या भावनांशी खेळणाऱ्या बेजबाबदार अधिकारी आणि ठेकेदारावर कडक कारवाई करण्याची मागणी खासदार बाळयामामा म्हात्रे यांच्याकडे केलीय.

## बदलापूर नगरपालिकेची बेकायदा होर्डिंग विरोधात कारवाई



दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**बदलापूर** : कुळगांव बदलापूर नगरपालिका हद्दीतील बेकायदेशीर आणि मुदतबाह्य व रस्त्यावर येणाऱ्या होर्डिंग तोडण्याच्या कारवाई प्रशासनाने आता वेग दिला आहे. ही कारवाई अधिक तीव्र स्वरूपात नगरपालिका प्रशासनाने सुरू केली असल्याची माहिती बदलापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी दिली. बदलापूर पूर्वेकडील कात्रप हायवे परिसरात झालेल्या कारवाईनंतर आज एमआयडीसी, खरवई, होप इंडिया कंपनी परिसर आदी भागात ही कारवाई अधिक जोमाने करण्यात आली.

कुळगांव बदलापूर नगरपालिका हद्दीत अनेक ठिकाणी बेकायदेशीर होर्डिंग उभारून त्याद्वारे लाखो रुपयांचा मलिदा कमविण्यात येत होता. तसेच काही बांधकाम व्यवसायिकांनी बेकायदेशीर होर्डिंग उभारल्या होत्या. या बेकायदेशीर होर्डिंग वर तोडक कारवाई करून कुळगांव बदलापूर नगरपालिका प्रशासनाने बदलापूर शहर बेकायदेशीर होर्डिंग मुक्त करण्याच्या मोहीमेचा पुढचा टप्पा आज पार केला. बदलापूर शहरात सध्या होर्डिंगचा ठेका कोणालाही देण्यात आलेला नाही. त्यामुळे नगरपालिका प्रशासनामार्फतच होर्डिंग लावण्याची परवानगी देण्यात येते. मात्र गेल्या काही वर्षात शहरात खाजगी जागांसह रस्त्यांवर बेकायदेशीर प्रमाणात होर्डिंग उभारण्यात आल्या होत्या. कुळगांव बदलापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी शहरातील अतिक्रमण हटवताना रस्त्यात वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या होर्डिंग सह मुदतबाह्य आणि बेकायदेशीर व प्रमाणापेक्षा मोठ्या होर्डिंग्सवरही कारवाईला सुरुवात केली आहे. त्यामुळे बदलापूर शहरातील बेकायदेशीर होर्डिंग मुक्त झाल्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## लहरी हवामानाचा भाजीपाल्याला फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : पावसाळ्यामध्ये शहापूर तालुक्यातील बहुतांश शेतकरी भात पिकाची लागवड करत असतात.तर खरीप हंगामानंतर रब्बी हंगामात बहुतांश शेतकरी भाजीपाला पिकाची लागवड करत असतात. ज्यांच्याकडे बऱ्यापैकी सिंचनाची सोय आहे असे जवळपास 70 टक्के शेतकरी भेंडी, कारली, घोसाळी, मिरची, काकडी, गवार, ढोबळी मिरची अशा प्रकारच्या भाजीपाल्याची लागवड करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असतात. मात्र यावर्षी लहरी हवामानामुळे भाजीपाला पिकाला अवकळा लागली असून मशागत, मजुरी, बियाणे लावलेली मुद्दल आणि केलेली उसनवार देखील मिळणार नसल्याचे संकेत शेतकऱ्यांना दिसून येत असल्याने शेतकरी राजा हवालदिल झाला आहे. यावर्षी पहाटेच्या वेळी थंडी आणि दमट वातावरण तर दुपारी कडक ऊन असे लहरी हवामान काही दिवसापासून असल्याने भाजीपाला पिकावर व्हायरस, दावणी, करप्या यासारख्या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे भाजीपाल्याचे भाव गेल्या वर्षीच्या तुलनेने मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. शेतकऱ्यांना यावर्षी लावलेली मुद्दल आणि झालेल्या खर्च देखील मिळेल की नाही याची चिंता सतावत आहे.दरम्यान उत्पादन वाढीच्या शेतकऱ्यांच्या नियोजनाला कायम निसर्गाच्या लहरीपणाचा अडसर ठरलेला आहे.जी स्थिती खरीप हंगामातील पिकांची झाली होती. त्यापेक्षा विदारक अवस्था ही रब्बी हंगामात पहावयास मिळत आहे. सातत्याने होत असलेल्या वातावरणातील बदलामुळे उत्पादनात घट होण्याचा धोका आहे.तसेच शेतकऱ्यांची मेहनत आणि कष्टही निष्फळ ठरत आहे.



### आर्थिक गणित जुळेना शेतकरी चिंतेत

**गेल्या वर्षी भाजीपाला लागवडीतून चांगले उत्पन्न मिळाले होते. मात्र यावर्षी लहरी हवामानामुळे आणि रोगांच्या प्रादुर्भावामुळे लागवडीचा बियाण्यांचा आणि मजुरीचा खर्च देखील जेमतेम मिळेल की नाही याची शंका आहे.**
**-नितीन पाटोळे,**
**भाजीपाला उत्पादक शेतकरी.**




## जिल्हास्तरीय सल्लागार समिती बैठक संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्हा सल्लागार समितीची तिमाही बैठक, जिल्हाधिकारी श्री. अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली दि.3 मार्च 2025 रोजी पार पडली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया च्या अग्रणी बँक (लीड बँक) योजनेअंतर्गत विविध विकासात्मक उपक्रम राबविण्यात समन्वय साधण्यासाठी बँकर्स तसेच सरकारी संस्था/विभागांसाठी जिल्हा पातळीवर एक सामान्य मंच म्हणून सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीला जिल्हा सल्लागार समित्यांची स्थापना करण्यात आली.

जिल्हाधिकारी हे जिल्हास्तरीय सल्लागार समिती बैठकांचे अध्यक्ष असतात. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नाबार्ड, जिल्ह्यातील लघु वित्त बँकांसह सर्व व्यावसायिक बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (डीसीसीबी) , आरआरबी, पेमेंट बँका, विविध राज्य सरकारी विभाग आणि संबंधित संस्था समिती चे सदस्य असतात. लीड डिस्ट्रिक्ट ऑफिसर (एलडीओ) समिती चे सदस्य म्हणून रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधित्व करतात. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक (एलडीएम) समिती ची बैठका आयोजित करतात. दि.03 मार्च 2025 रोजी आयोजित बैठकीसाठी श्री.अभिषेक पवार, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक,ठाणे,श्री. अरुण बाबू , रिजर्व बँक ऑफ इंडिया,मुंबई, श्री, सुधांशुकुमार अश्विनी, नाबार्ड, छायादेवी शिसोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे,रामेश्वर पाचे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, ठाणे,सोनाली देवरे, महा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र,ठाणे, श्रीकांत पठारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जि.म.स.बँक तसेच ठाणे जिल्ह्यातील विविध बँक जिल्हा समन्वय अधिकारी उपस्थित होते.



## गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः । स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ ४-१८ ॥

जो माणूस कर्मामध्ये अकर्म पाहील आणि अकर्मामध्ये कर्म पाहील, तो मनुष्यांमध्ये बुद्धिमान होय आणि तो योगी सर्व कर्मे करणारा आहे. ॥ ४-१८ ॥

यस्य सर्वे समारम्भाः कामसङ्कल्पवर्जिताः । ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः ॥ ४-१९ ॥

ज्याची सर्व शास्त्रसंमत कर्मे कामनारहित व संकल्परहित असतात, तसेच ज्याची सर्व कर्मे ज्ञानरूप अग्नीने जळून गेली आहेत, त्या महामनुष्याला ज्ञानी लोकही पंडित म्हणतात. ॥ ४-१९ ॥

त्यक्त्वा कर्मफलासङ्गं नित्यतृप्तो निराश्रयः । कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किञ्चित्करोति सः ॥ ४-२० ॥

जो मनुष्य सर्व कर्मांमध्ये आणि त्यांच्या फळांमध्ये आसक्ती पूर्णपणे टाकून तसेच सांसारिक आश्रय सोडून देऊन परमात्म्यात नित्यतृप्त असतो, तो कर्मांमध्ये उत्तमप्रकारे वावरत असूनही वास्तविक काहीच करत नाही. ॥ ४-२० ॥

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः । शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ ४-२१ ॥

ज्याने अंतःकरण व इंद्रियांसह शरीर जिंकले आहे आणि सर्व भोगसामग्रीचा त्याग केला आहे, असा आशा नसलेला मनुष्य केवळ शरीरसंबंधीचे कर्म करीत राहूनही पापी होत नाही. ॥ ४-२१ ॥

## आरोग्य

## चिया सीड्स वॉटरचे फायदे

१. शरीर हायड्रेट ठेवण्यास मदत करतो-
उन्हाळ्यात गरमीमुळे व शरीरातील चिप – चिप मुळे जास्त घाम येतो, ज्यामुळे शरीरातील पाणी कमी होऊन डिहायड्रेशनचा त्रास उद्भवतात. चिया सीड्स पाण्यात काही तास भिजवल्यावर जेलसारखे होतात आणि हे पोटात जाऊन शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करतात.

२. उष्णतेपासून संरक्षण करते-
चिया सीड्समध्ये थंड प्रभाव असतो. उन्हाळ्यात ते नियमित प्यायल्यास शरीराचे तापमान नियंत्रित राहते आणि उष्णतेपासून संरक्षण होते.

3. उर्जा वाढवते-
उन्हाळ्यात खुप प्रमाणात थकवा आणि कमजोरी जाणवते. चिया सीड्समध्ये असलेले जिवनसत्व शरीराला ऊर्जा देतात, ज्यामुळे दिवसभर ताजेतवाने वाटते.

४. वजन नियंत्रणात रहोते-
चिया सीड्स वॉटरने पचन मंदावते, ज्यामुळे पोट भरलेले राहते व वारंवार भूख लागत नाही. हे वजन नियंत्रणात ठवण्यास मदत करते.

५. हाडांची मजबूती बनवणे-
चिया सीड्समध्ये खुप प्रमाणात कॅल्शियम, मॅग्रेशियम असतात, जे हाडांसाठी उपयुक्त असतात. उन्हाळ्यात घामामुळे शरीरातून मिनरल्स बाहेर टाकले जातात, दररोज 'हे' पेय प्यायल्याने हाड बळकट होण्यास मदत होते.

६. पचनशक्ती वाढवते-
सतत गरम आणि हेवी फुड खाल्याने अनेकांना अपचन, ॲसिडिटीचा त्रास होतो. चिया सीड्समध्ये फायबर असते, जे पचनसंस्था सुधारवण्यास मदत करते.

# मातृभाषेतून शिक्षण ही काळाची गरज




शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत.

मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही. उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस,आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के

मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे. महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते.

जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते. या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे पुणे येथे शैक्षणिक प्रकल्प सादर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : ठाणे जिल्हा परिषद, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने व वोपा संस्था यांच्या मदतीने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे येथे ठाणे जिल्ह्याचा दिशा प्रकल्प तसेच अध्ययन स्तर निश्चितीकरण, व्ही-स्कूल ॲपची परिणामकारकता याबाबत ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने सादरीकरण करण्यात आले.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन 2020 नुसार निपुण भारत अंतर्गत शंभर टक्के विद्यार्थ्यांना मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या संकल्पनेतून ठाणे जिल्ह्यात जिल्हा परिषद ठाणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने व वोपा संस्था यांच्या मदतीने व्ही-स्कूल पोर्टलच्या माध्यमातून शंभर टक्के विद्यार्थ्यांचा दरमहा 25 ते 30/31 पर्यंत अध्ययन स्तर निश्चितीकरण करण्यात येते.

सदर, उपक्रमाच्या अनुषंगाने दिशा प्रकल्प बाबत अंमलबजावणी आणि वस्तुस्थिती यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (एससीइआरटी) येथे दिशा प्रकल्पाचे ठाणे जिल्ह्यातील परिणामकारकते बाबत सादरीकरण करण्यात आले. या दिशा ॲप तसेच व्ही-स्कूल ॲपच्या माध्यमातून याविषयी ठाणे जिल्ह्याचा एकंदरीत विद्यार्थी गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने घेत असलेल्या उपक्रमांचे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (एससीइआरटी)चे संचालक राहुल रेखावार (भा.प्र.से.) यांच्यासमोर सादरीकरण केले.

यामध्ये दिशा ॲप अंतर्गत घेण्यात येणारे अध्ययन स्तर निश्चिती तसेच त्यानुसार घेण्यात आलेली जुनी चाचणी, एआय चाचणी, शंभर दिवस शाळा भेट उपक्रम, विद्यार्थी कृती आराखडे, भाषा, गणित, इंग्रजी साहित्य पेट्या , शिक्षण परिषद, शिक्षक प्रशिक्षण, कृतींचा शनिवार, आनंददायी शनिवार, जादूचा पिटारा इत्यादी उपक्रमांच्या यशस्वीतेबद्दल माहिती देण्यात आली असल्याचे प्राथमिक शिक्षिका मंगल डोईफोडे यांनी म्हटले.

दरम्यान, या झालेल्या सादरीकरणात ठाणे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ठाणे अधिव्याख्याता डॉ. दिनेश चौधरी, जिल्हा परिषद शिक्षण विभाग विस्तार अधिकारी आशिष झुंजारराव, दिशा (आय.इ.) जिल्हा परिषदेचे जिल्हा समन्वयक भरत वेखंडे, वोपो संस्थेच्या संचालिका ऋतुजा जेवे, संस्थापक प्रफुल्ल शशिकांत, कसारा जि.प. शाळेचे केंद्र प्रमुख अशोक मोरे, घोटसई जि.प. शाळेच्या उपशिक्षिका सुवर्णा संसारे, मानिवली जि.प. शाळेच्या शिक्षिका मंगल डोईफोडे, वोपो प्रकल्प सहकारी रोहित ठाकूर यांनी सहभाग घेतला होता.

# ठाण्यात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आसरा फाउंडेशन आणि मित्र मेळा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, 8 मार्च 2025 रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा श्री मावळी मंडळ हायस्कूल, धोबी आळी, चरई, ठाणे (पश्चिम) येथे सकाळी 10 ते दुपारी 3 या वेळेत होणार आहे.

"कुशल महाराष्ट्र, रोजगारक्षम महाराष्ट्र" या ध्येयाने आयोजित केलेल्या या मेळाव्यात अनेक नामांकित उद्योग आणि कंपन्यांमध्ये थेट नोकरीच्या मुलाखती (ऑन द स्पॉट जॉब इंटरव्ह्यू) घेतल्या जाणार आहेत. याशिवाय, कौशल्य विभागाच्या माध्यमातून प्रशिक्षण, स्टार्टअप आणि उद्योजकतेसाठी मार्गदर्शन, अप्रेंटिसशिपसाठी नोंदणी, बायोडाटा कसा लिहावा आणि मुलाखत कशी द्यावी याचे प्रशिक्षण, स्वयंरोजगार मार्गदर्शन आणि विविध कर्ज योजनांची (PMEGP, CMEGP, मुद्रा लोन, SEDD मनी योजना) माहिती तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना मार्गदर्शन उपलब्ध असेल.या मेळाव्याचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा आणि ठाणे शहर आमदार संजय केळकर यांच्या उपस्थितीत होणार आहे.


या मेळाव्याचा लाभ घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी वेळेवर उपस्थित राहावे तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधावा, असे संयुक्त आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आसरा फाउंडेशन आणि मित्र मेळा सामाजिक संस्था या आयोजकांनी केले आहे.

# शहाड सीएनजी पंपावर विजेअभावी सेवा ठप्प

## वाहनचालकांचे हाल, मूलभूत सुविधांचाही अभाव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शहाड येथील मोहने रोड वर असलेल्या अलायन्स एनर्जी ग्रुपच्या सीएनजी पंपावर वारंवार होणाऱ्या वीज खंडीतमुळे वाहनचालकांचा संताप उफाळला आहे. या पंपावर सीएनजी भरण्यासाठी आलेल्या रिक्षा आणि चारचाकी वाहनधारकांना तासनतास प्रतीक्षा करावी लागते, मात्र या समस्येवर कोणतेही उपाय केले जात नाहीत. सर्वांत मोठी समस्या म्हणजे विद्युत पुरवठा खंडित झाल्यास पर्यायी उपाय म्हणून जनरेटरची कोणतीही व्यवस्था नाही. पंपाच्या परवानगी प्रक्रियेत जनरेटर असणे आवश्यक असल्याची अट असते, मात्र प्रत्यक्षात येथे त्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे.




शनिवारच्या दिवशी हा गैरसोयीचा मुद्दा अधिकच चिघळला. सकाळपासूनच सीएनजी भरण्यासाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. काही वेळानंतर अचानक वीजपुरवठा खंडित झाला आणि सर्वच काम ठप्प झाले. वाहनचालकांना तासनतास प्रतीक्षा करावी लागली, मात्र पंप व्यवस्थापनाने कोणतीही स्पष्ट सूचना दिली नाही. या गोंधळात वाहनधारकांनी पंप कर्मचाऱ्यांकडे उत्तरदायित्वाची मागणी केली असता, त्यांच्याशी उद्धटपणे बोलले गेले. काही वाहनचालकांनी सांगितले की, पंप व्यवस्थापकांचा वर्तन कठोर आणि उद्धट असून, ग्राहकांच्या समस्या ऐकून घेण्याची त्यांची कोणतीही तयारी नाही.

केवळ सीएनजी भरण्याच्या गैरसोयीपुरतेच हे प्रकरण मर्यादित नसून, इतर मूलभूत सुविधांच्या अभावामुळेही वाहनधारक त्रस्त आहेत. या पंपावर शौचालयाची सुविधा असली तरी ती फक्त स्टाफसाठी राखून ठेवली गेली आहे. ग्राहकांना त्याचा वापर करू दिला जात नाही. पंपावर तासनतास थांबावे लागत असतानाही स्वच्छतागृह न वापरण्याची सक्ती केली जात आहे, त्यामुळे अनेकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

वाहनचालकांच्या या तक्रारींकडे संबंधित प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. सीएनजी पंपावरील सेवा सुरळीत राहावी यासाठी आवश्यक सुविधा पुरवणे, जनरेटरची व्यवस्था करणे आणि ग्राहकांशी सौजन्यपूर्ण वागणूक राखणे या बाबी पंपधारकांनी तातडीने अमलात आणाव्यात, अशी मागणी वाहनधारकांकडून केली जात आहे. प्रशासनानेही या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन, नियमांचे पालन होत आहे का, याची चौकशी करावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

याबात येथील व्यवस्थापक उमेश परिहार याच्याशी विचारणा केली असता सीएनजी पंपावर जनरेटर असणे बंधकारक नाही असे सांगत उडावाउडवीची उत्तरे दिली. तसेच ग्राहकांना शौचालय वापरण्यास मनाई केल्याच्या प्रकाराबाबत विचारणा केली असता शौचलय उघडेच असते त्याला कुलुप लावल्र जात नाही असे सांगत हा आरोप फेटाळला. याबबत एका सबंधित अधिकाऱ्याशी बोलणे केले असता महानगरपालिका सीएनजी पंपांना बॅकअपसाठी जनरेटर किंवा इन्व्हर्टर ठेवण्याचा सल्ला देतात, विशेषतः ज्या ठिकाणी वारंवार वीजपुरवठा खंडित होतो. काही ठिकाणी परवानगी देताना हे एक अट म्हणून घातले जात असल्याचे सांगितले.

# विलेपार्लेतील मल्लखांब खेळाडूंची नेत्रदीपक कामगिरी

विलेपार्ले मधील दोन मल्लखांब खेळाडू जान्हवी जाधव व रिषभ घुबडे या दोघांनी उत्तराखंड येथे नुकत्याच झालेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मोलाची कामगिरी केली आहे. प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष आणि मल्लखांब संघ अंधेरीचे अध्यक्ष माननीय अरविंद प्रभू सरांनी या दोन्ही विजेत्या मल्लखांब खेळाडूंची भेट घेतली व त्यांचे कौतुक केले.या प्रसंगी श्री.सुनील वालावरकर सर सुद्धा उपस्थित होते. वर्ल्ड चॅम्पियन जान्हवी जाधव हिने दोरी मल्लखांब साधन प्रकारात सुवर्ण पदक,सांघिक



रौप्य पदक व पुरलेला मल्लखांब साधन प्रकारात कांस्य पदक पटकाविले तर रिषभ घुबडे ह्याने सुद्धा दोरी मल्लखांब साधन प्रकारात सुवर्ण पदक,सांघिक रौप्य पदक व वैयक्तिक विजेतेपद स्पर्धेत कांस्य पदक अशी प्रत्येकी तब्बल तीन पदके जिंकली. अशा कठीण स्पर्धेत पदके मिळवणे खूपच कौतुकास्पद आहे.या दोघांचे प्रशिक्षक मल्लखांब खेळातील द्रोणाचार्य पुरस्कार विजेते श्री.गणेश देवरुखकर यांचा खूप मोलाचा वाटा आहे तसेच आंतरराष्ट्रीय पंच इशा देवरुखकर व वरीष्ठ प्रशिक्षक श्री.महेश अटाळे सर यांचे मार्गदर्शन सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे.अरविंद सरांनी या विजेत्या खेळाडूंना आशीर्वाद तर दिलाच पण पुढील येणाऱ्या स्पर्धेसाठी खूप छान मार्गदर्शन दिले,तसेच या पुढेही संकुलाच्या सुखसुविधा देण्याचे निश्चित केले आहे.

# डोहोळे ग्रामपंचायतीचा 'माझी वसुंधरा अभियान' पुरस्कारसाठी प्रस्ताव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : तालुका सुंदर गांव' पुरस्कार प्राप्त झालेल्या व जिल्हा स्तरावरही पुरस्काराचा मानकरी ठरणार असे स्पष्ट झालेल्या डोहोळे या ग्रुप ग्रामपंचायत विभागांनी 'माझी वसुंधरा या अभियान 5.0' अभियानच्या विभागीय व राज्य स्तरीय पुरस्कारसाठी प्रस्तावित केलेले असून या पुरस्कार पात्र होण्याच्या अनुषंगाने तयारी सुरू केली आहे.




येथील डोहोळे या ग्रुप ग्रामपंचायत मध्ये डोहोळे, कोशिंबी, कळंबोली, आन्हे, सोर या पाच गावे मिळून असलेल्या ग्रामपंचायत विभाग यांनी विविध उपक्रम व विकास कामे हाती घेत ग्रामपंचायतीला शासनाचे विविध पुरस्कार प्राप्त होण्याकामी प्रयत्नशील ठरत आहे. नुकतेच ग्रामपंचायतीला जिल्हा परिषद ठाणे विभागांनी घेतलेल्या आर.आर. (आबा) पाटील सुंदर गांव योजनेंतर्गत जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये या ग्रामपंचायतीला तालुका स्तरावर 'तालुका सुंदर गांव' पुरस्कार प्राप्त होऊन जिल्हा स्तरावरही पुरस्काराचा मानकरी ठरणार असे निश्चित झाले आहे.

महाराष्ट्र शासन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने व 'माझी वसुंधरा या अभियान 5.0' अंतर्गत असलेल्या कोकण विभागीय व राज्य स्तरीय पुरस्कार पात्र होण्यासाठी सदर ग्रामपंचायत विभाग स्पर्धेत असून यासाठी लागणारे सर्व निकष पूर्ण करण्यासाठी करावयाची लागलेली कामे व उपक्रम राबविण्यासाठी ग्रामपंचायत समिती, ग्रामपंचायत अधिकारी व ग्रामपंचायत व ग्राम स्तरीय इतर कर्मचारी यांचे प्रयत्न सुरू असल्याचे ग्रामपंचायत विभाग समिती पदाधिकारी व अधिकारी यांनी म्हटले आहे.

दरम्यान, कोकण उपायुक्त डॉ. प्रदीप घोरपडे, कोकण विभागीय माझी वसुंधरा अभियानचे सहकारी अमोल पडळकर यांनी ग्रामपंचायत डोहोळे येथे उपस्थिती दर्शवून 'माझी वसुंधरा या अभियान 5.0' अंतर्गत झालेल्या व सुरू असलेल्या कामांची पहाणी करून मार्गदर्शन केले.



# ठाण्यातील अनधिकृत बॅनर थेट भंगारात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रातील बेकायदा तसेच धोकादायक जाहिरात फलक ठेकेदाराने स्वखर्चाने काढून भंगारात विकून त्या मोबदल्यात पालिकेला पैसे देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

या निर्णयानुसार पालिकेने दोन वर्षांसाठी भंगार विक्रिचा ठेका देण्यासाठी दरपत्रके मागविली असून यानुसार पालिकेकडे प्राप्त झालेल्या चारपैकी एकाचा दर २६ रुपये ७० पैसे इतका आहे. हा दर तीन दरपत्रकांपेक्षा जास्त असल्याने त्यास पालिकेच्या प्रशासकीय सभेने मान्यता दिली आहे. यामुळे पालिकेला आता भंगार विक्रितून पालिकेला प्रति किलोमागे २६ रुपये ७० पैसे मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

## पालिकेला मिळणार प्रति किलो २६ रुपये

घाटकोपरमधील जाहीराक फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर ठाण्यातील बेकायदा जाहीरात फलकांचा मुद्दा ऐरणीवर आला होता. यावरून टिका होऊ लागताच ठाणे महापालिकेने बेकायदा जाहीरात फलकांविरोधात कारवाई सुरू केली होती. या कारवाईत शहरातील ४९ जाहिरात फलकांवर पालिकेने कारवाई केली होती. ४९ पैकी ५ जाहिरात फलक पुर्णपणे निष्कासित करण्यात आले होते, तर परवानगी पेक्षा जास्त आकाराच्या ४४ जाहिरात फलकांचा अतिरिक्त भागाचा फक्त पत्रा काढण्यात आला होता. याशिवाय, पाालिकेने जाहिरात फलकांचे लोखंडी सांगाडे धोकादायक आहेत की नाही, याची पाहाणी करण्यासाठी संबंधित कंपनी मालकांना फलकांचे स्थैर्यता प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. यानुसार २६० जाहिरात कंपन्यांनी जाहिरात फलकांचे स्थैर्यता प्रमाणपत्र पालिकेकडे सादर केले होते. या पाठोपाठ आता पालिकेने बेकायदा आणि धोकादायक फलकांचे लोखंडी सांगाडे नियुक्त ठेकेदाराने स्वखर्चाने काढून घेऊन भंगारात विकणे आणि त्या बदल्यात पालिकेला किलोमागे पैसे देणे, असा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या संबंधीचा प्रस्ताव पालिकेने तयार केला होता. त्यास आयुक्तांनी मान्यता दिल्यानंतर तो प्रशासकीय सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यास प्रशासकीय सभेनेही मान्यता दिली आहे.



**ठाणे महापालिका क्षेत्रातील बेकायदा तसेच धोकादायक जाहिरात फलक स्वखर्चाने काढून घेणे आणि भंगारात विकून त्या मोबदल्यात पालिकेस प्रतिकिलो जास्तीत जास्त पैसे देणे या निकषावर आधारीत पालिकेने दोन वर्षांकरिता दर पत्रके मागविली होती. यामध्ये चारजणांनी दरपत्रके पालिकेक़डे सादर केली होती.**

**यानुसार नवी मुंबईतील मे. सादिक स्क्रॅप मर्चंट कंपनीने लोखंडी साहित्य प्रतिकिलो १५ रुपये तर, लाकडी साहित्यसाठी प्रति किलो २ रुपये असा दर दिला होता. ठाण्यातील मे. ब्राईट कन्स्ट्रक्शन अ‍ॅण्ड डेव्हलपर्स कंपनीने लोखंड प्रति किलो २३ रुपये ५ पैसे, मे. साईराज स्क्रॅप ट्रेडर्स कंपनीने लोखंड प्रति किलो २६ रुपये २५ पैसे तर, मे. मुस्ताक स्क्रॅप ट्रेडर्स कंपनीने लोखंड प्रति किलो २६ रुपये ७० पैसे असे दर पत्रक सादर केले होते.**

**यापैकी मे. मुस्ताक स्क्रॅप ट्रेडर्स कंपनीचे दरपत्रक स्विकारण्यास पालिकेच्या प्रशासकीय सभेने मान्यता दिली असून यामुळे पालिकेला आता भंगार विक्रितून पालिकेला प्रति किलोमागे २६ रुपये ७० पैसे मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे.**

# गास गावातील आरक्षणे रद्द
## जनक्षोभापुढे वसई पालिकेची माघार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई** : वसईच्या गास गावात महापालिकेने टाकलेल्या आरक्षणाविरोधात जनक्षोभ उसळल्यानंतर वसई विरार महापालिकेने माघार घेतली आहे. गास गावातील कचराभूमीचे आरक्षण तसेच सांडपाणी प्रकल्पासाठी वाढीव जागेचे आरक्षण रद्द करत असल्याची घोषणा मंगळवारी संध्याकाळी उशीरा महापालिकेने केली. तसेच आचोळे येथील ४१ इमारतींच्या जागेवरील सांडपाणी आणि कचराभूमीचे आरक्षण देखील कायम ठेवणार असल्याचेही जाहीर केले. हा निर्णय येताच आंदोलन सुरू असलेल्या नागरिकांनी एकच जल्लोष केला.



वसई पश्चिमेच्या निसर्गरम्य गास गावात वसई विरार महापालिकेने कचराभूमी आणि वाढीव सांडपाणी प्रकल्पासाठी आरक्षण ठेवले होते.२९ जानेवारीना रोजी याबाबतची प्रारूप अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली होती. मात्र सर्वसामान्य नागरिकांना याची कुठलीच माहिती नव्हती. जेव्हा ही माहिती लोकांना पोहोचली तेव्हा संतापाची लाट उसळली होती. विविध पक्ष आणि संघटनांनी आंदोलने केली होती. वसईचे माजी आमदार हितेंद्र ठाकूर तसेच विद्यमान आमदार स्नेहा दुबे पंडित, नालासोपाऱ्याचे आमदार राजन नाईक यांनी या निर्णयाला जोरदार विरोध केला होता. आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना भेटून ही बाब सांगितल्यानंतर मुख्यमंत्री देखील संतापले होते आणि त्यांनी तात्काळ महापालिकेला फेरबदलाचे निर्देश दिले होते.अखेर मंगळवारी संध्याकाळी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी प्रसिध्दीपत्र काढून गास गावातील कचराभूमीचे आरक्षण तसेच सांडपाणी प्रकल्पाचे वाढीव जागेवरील आरक्षण रद्द करत असल्याचे जाहीर केले. भविष्यात २०४१ साला पर्यंत मध्ये शहराची लोकसंख्या ५० लाखांच्या पुढे जाणार आहे. त्यामुळे गास गावात सांडपाणी आणि कचराभूमीचे आरक्षण टाकले होते. मात्र लोकभावना तसेच आमदारांच्या विरोधामुळे ही आरक्षणे रद्द करत असल्याचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले.

# हॉटेलांमधील कचऱ्याचा प्रश्न सुटणार ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : भिवंडी शहरातील हॉटेल आणि बारमधील कचरा, शिल्लक राहीलेले अन्न याचा कचरा दैनंदिन स्वरुपात हॉटेलबाहेर फेकण्यात येत असल्याची बाब नवनियुक्त पालिका आयुक्त अनमोल सागर यांच्या निदर्शनास आली असून त्याची गंभीर दखल घेत त्यांनी मंगळवारी उपहारगृह मालकांच्या संघटनेबरोबर बैठक घेऊन कचऱ्याच्या डब्यांमध्येच कचरा टाकण्याची सुचना केली आहे. तसेच सर्व व्यावसायीक आस्थापनांसाठी घंटागाडीच्या वेळा आणि मार्ग निश्चीत करुन दिवसातुन दोन वेळा कचरा गोळा करावा अशा सुचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

भिवंडी महापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी शहर स्वच्छतेवर भर देण्यास सुरूवात केली असून त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी शहरातील सर्व हॉटेल,बार, परमीट रुम मालक आणि त्यांच्या संघटनांसोबत बैठक घेतली. या बैठकीस अतिरीक्त आयुक्त देवीदास पवार, उपायुक्त (आरोग्य) शैलेश दोंदे, जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांच्यासह पालिकेचे अधिकारी आणि हॉटेल, बार आणि परमीट मालक तसेच त्यांचे संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. हॉटेल मधील कचरा, शिल्लक राहीलेले किंवा वाया गेलेले अन्न याचा कचरा दैनंदिन स्वरुपात हॉटेल बाहेर फेकण्यात येत असल्याची बाब आयुक्त सागर यांच्या निदर्शनास आली होती. त्याची दखल घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी त्यांनी बैठक आयोजीत केली होती.

शहर स्वच्छतेची जबाबदारी महापालिकेची आहेच. पण, त्याचबरोबर हॉटेल, बार, परमीट रुम मालक हे देखील शहराचे भागधारक आहेत. त्यामुळे त्यांच्या परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी ही त्यांची सुद्धा असणार आहे, असे त्यांनी बैठकीत सांगितले.



## भिवंडी पालिका आयुक्तांची हॉटेल मालक संघटनेबरोबर बैठक

हॉटेल, बार, परमीट रुम चालक, मालक या सर्वांनी त्यांचे गाळयाच्याबाहेर ओला कचरा आणि सुका कचरा यासाठी मोठे कचरा डबे ठेवावेत. तसेच त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी निर्माण होणारा कचरा त्यांनीच वर्गवारी करुन त्या डब्यांमध्ये टाकावा, अशा सुचनाही त्यांनी केल्या. यापुढे सर्व आरोग्य निरीक्षकांनी दोन ते तीन वेळा अचानक भेटी देऊन कचरा वर्गीकरणासाठी डब्बे ठेवले आहेत की नाही, तसेच, कचऱ्याचे वर्गीकरण होत आहे किंवा नाही याची पहाणी करावी. तसेच सकाळी किंवा संध्याकाळी घंटा गाडीने कचरा गोळा केल्यावर पुन:श्च मधल्या कालावधीत जमा होणाऱ्या कचऱ्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी, अशा सुचना त्यांनी प्रशासनाला केल्या.

दररोज घंटागाडी उपलब्ध झाली पाहीजे, अशी मागणी हॉटेल मालकांनी यावेळी केली. तसेच, स्वच्छतेबाबत हॉटेल मालक देखील आग्रही असतात. परंतु अनेकवेळा नागरीक देखील हुज्जत घालत असल्याने त्यांचा नाईलाज होतो, असेही हॉटेल मालकांनी सांगितले. त्यावर अशा वेळी त्या त्या क्षेत्रातील आरोग्य निरीक्षकला कळविण्यात यावे. महापालिकेकडून त्यांना सहकार्य केले जाईल, असे आयुक्त सागर यांनी सांगितले.

**दररोज घंटागाडी उपलब्ध झाली पाहीजे अशी हॉटेल मालकांची मागणी आहे तसेच, स्वच्छतेबाबत हॉटेल मालक देखील आग्रही असतात मात्र अनेकवेळा नागरीक देखील हुज्जत घालत असल्याने त्यांचा नाईलाज होतो. यावर प्रशासक तथा आयुक्त महोदयांनी पर्याय दिला आहे की, अशा वेळी त्या त्या क्षेत्रातील आरोग्य निरीक्षकला कळविण्यात यावे. महानगरपालिकेकडून त्यांना सहकार्य केले जाईल. यापुढे ज्या क्षेत्रात सलग हॉटेल, खानावळ, बार असतील त्या क्षेत्राला नो वेस्ट झोन म्हणून घोषीत केले जाईल. त्या ठिकाणी हॉटेल संघटनेच्या सहकार्याने सुशोभीकरण करण्यात येईल. तसचे, यापुढे सर्व व्यावसायीक आस्थापनांसाठी घंटागाडीच्या वेळा व मार्ग निश्चीत करुन दिवसातुन दोन वेळा कचरा गोळा केला जाईल**

**अनमोल सागर**
**आयुक्त भिवंडी महापालिका**

यापुढे ज्या क्षेत्रात सलग हॉटेल, खानावळ, बार असतील, त्या क्षेत्राला नो वेस्ट झोन म्हणून घोषीत केले जाईल. त्या ठिकाणी हॉटेल संघटनेच्या सहकार्याने सुशोभीकरण करण्यात येईल. तसेच, यापुढे सर्व व्यावसायीक आस्थापनांसाठी घंटागाडीच्या वेळा आणि मार्ग निश्चीत करुन दिवसातुन दोन वेळा कचरा गोळा केला जाईल, असे आश्वासनही आयुक्तांनी दिले.

# दिव्यातील सात गोदामे जळून खाक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : दिवा येथील खर्डीगाव भागात सात गोदामे जळून खाक झाल्याचा प्रकार मंगळवारी रात्री उघडकीस आला. या गोदामांमध्ये पाच भंगाराची, एक प्लास्टिक गोदाम आणि एक लाकडाची वखार होती. या घटनेत कोणीही जखमी झाले नसले तरी या आगीमुळे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले होते. तसेच आगीचे लोट निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण होते.**

खर्डीगाव येथील चौधरी कंपाऊंड परिसरातील एका खुल्या मैदानात पाच भंगाराची गोदामे, लाकडी वखार आणि प्लास्टिकचे गोदाम आहे. मंगळवारी रात्री १० वाजताच्या सुमारास या गोदामांना अचानक आग लागली. गोदामामध्ये प्लास्टिक आणि लाकूड असल्याने आगीने रौद्ररूप धारण केले होते. धुराचे आणि आगीचे लोट हवेत पसरले होते. त्यामुळे परिसरात नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले. घटनेची माहिती ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाला मिळाल्यानंतर दिवा, मुंब्रा आणि शीळ येथील अग्निशमन दलाचे जवान आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी घटनास्थळी दाखल झाले. आगीवर नियंत्रण मिळविताना अग्निशमन दलाच्या जवानांना नाकी नऊ आले होते.

स्थानिक रहिवाशांनी देखील अग्निशमन दलाच्या जवानांची मदत केली. अखेर तीन तासांच्या प्रयत्नानंतर येथील आगीव नियंत्रण मिळविणे जवानांना शक्य झाले. या आगीमध्ये गोदामे संपूर्ण जळून खाक झाले आहेत.

# पनवेल मनपाच्या तिजोरीत चार दिवसात साडेपाच कोटी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** : यंदाच्या आर्थिक वर्षामध्ये एप्रिल २०२४ ते ४ मार्च या दरम्यान पनवेल महापालिकेच्या तिजोरीत ३४१ कोटींहून अधिक मालमत्ता कर जमा झाला आहे. मालमत्ता कर हा महापालिकेचा एकमेव आर्थिक स्रोत असून पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या काही महिन्यांपासून नागरिकांनी मालमत्ता लवकरात लवकर भरावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

३१ मार्च ही मालमत्ता कर भरण्याची शेवटची तारीख आहे. मालमत्ता कराच्या शास्तीमध्ये दर महिन्याला २ टक्क्यांची वाढ होत असल्याने करदाते मालमत्ता कर भरत आहेत. मागील चार दिवसात दररोज पालिकेच्या तिजोरीत १ कोटीहून अधिक रकमेची भर पडत आहे. यामध्ये १ ते चार मार्च या दरम्यान ५ कोटी ५६ लाख रुपयांचा भरणा झाल्याचे पालिकेने कळवले आहे.

**मालमत्ता कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाच स्रोत आहे. महापालिकेची विविध विकास कामे सध्या सुरू असून महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी आपला थकीत मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे.**

**– स्वरूप खारगे,**
**सहाय्यक आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

मालमत्ताधारकांना नावामध्ये बदल करायचा असल्यास महापालिकेच्या 'PMC TAX APP' मोबाईल अ‍ॅपच्या माध्यमातून करता येईल. या अ‍ॅपमध्ये नाव बदलाकरीता विनंती केल्यास महापालिकेकडून नाव बदलानंतर संबधितांस नोटिफिकेशन मिळणार आहे. मालमत्ताधारकांना मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी महापालिकेने 'PMC TAX APP' विकसित केले आहे. www. panvelmc.org या संकेतस्थळावर जाऊनही करदाते त्यांचा कर भरु शकतील असे पालिकेने प्रसिद्धीपत्रकातून कळवले आहे. अधिक माहितीसाठी १८०० ५३२०३४० या टोल फ्री क्रमांकावरती संपर्क साधावा, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

# जिल्हा परिषदेत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे - दि ०५** - जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने प्रत्येक महिन्यात आनंददायी निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आज, दि. 05 मार्च 2025 रोजी, जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडला.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करून पुढील आयुष्याकरिता शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम शिक्षकांनी केले आहे. ठाणे ग्रामीण भागात 35 वर्ष पेक्षा अधिक काळ कामकाज केल्याबद्दल सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी- कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांचे अभिनंदन केले. यावेळी सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी (सा.प्र.वि) कल्पना तोरवणे, सहाय्यक प्रशासन अधिकारी (शिक्षण प्राथमिक) श्रीकांत खंडागळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी (सा.प्र.वि) मनोज देवकर, कनिष्ठ प्रशासन अधिकारी (शिक्षण प्राथमिक) शंकर आरे तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) अविनाश फडतरे यांच्या शुभहस्ते 20 सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, पेन्शन आदेश देऊन सन्मान करण्यात आला.

केंद्रप्रमुख किशोर भोईर यांनी जिल्हा परिषदेत सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार कार्यक्रम नियोजन केल्याबद्दल आभार व्यक्त केले. विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी कामकाज करण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांना आज विविध क्षेत्रात काम करताना पाहून काम केल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

जानेवारी महिन्यातील शिक्षण विभाग प्राथमिक 06, बांधकाम 02 असे एकूण 08 अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत तर फेब्रुवारी महिन्यातील शिक्षण विभाग प्राथमिक 09, आरोग्य विभाग 02, बांधकाम 01 असे एकूण 12 अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. असे एकूण 20 सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सन्मान सोहळा आज पार पाडला. विस्तार अधिकारी (शिक्षण), प्राथमिक शिक्षक, केंद्रप्रमुख, पदवीदर शिक्षक, आरोग्य सेविका (महिला), आरोग्य सहाय्यक (पुरुष), कनिष्ठ अभियंता, मैल कामगार या पदावरील अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत.

# वाशी खाडी पूल वाहतुकीसाठी सज्ज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : ठाणे खाडीवर मुंबई-पुणे, पुणे-मुंबई दोन्ही दिशांना दोन २ नवीन बहुचर्चित उड्डाणपूल तयार करण्यात आले असून आता वाशीहून मुंबईकडे जाणाऱ्या तिसऱ्या उड्डाणपुलाचे कामही पूर्णत्वास आले आहे. तर मानखुर्दच्या दिशेने नवी मुंबईकडे येणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून पुढील काही दिवसांतच या मार्गावर होणाऱ्या वाहतूककोंडीतून वाहनचालकांची सुटका होणार असल्याची माहिती मानखुर्द व नवी मुंबई वाहतूक विभागाने दिली आहे. अटलसेतू झाल्यानंतर वाशी उड्डाणपुलावरील ताण काहीसा कमी झाला होता. तसेच उरण, पनवेलची वाहतूक अटल सेतूवरुन जात होती. परंतु शासनाच्या टोलमाफीनंतर अटल सेतूवरुन मुंबईला दररोज जाणाऱ्या १० ते १२ हजार गाड्यांची वाहतूक पुन्हा वाशी खाडीपूल मार्गाने होत आहे.

मुंबईहून वाशीकडे येणाऱ्या पुलावरुन वाहतूक सुरू झाली असली तरी मानखुर्द दिशेकडील काम सुरू असल्याने मुंबईहून वाशीकडे येताना ५ लेनची वाहतूक २ लेनमध्ये वर्ग होत होती. त्यामुळे उड्डाणपुलाच्या तोंडाशी मानखुर्दपर्यंत रांगा लागत होत्या. परंतु आता हे काम पूर्णत्वास आले असल्याची माहिती एल अँड टी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# कल्याण तळोजा मेट्रो कामाचा वेग वाढवा
## आमदार राजेश मोरे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण- नवी मुंबई, पनवेल, तळोजा शहरे जोडणारा कल्याण-तळोजा मेट्रो मार्ग १२ हा महत्वाचा दुवा आहे. या मेट्रो मार्गाचे काम गेल्या वर्षापासून सुरू आहे. या मेट्रो मार्ग कामातील बाधित शेतकऱ्यांचा मोबदला आणि इतर अडथळे लवकर दूर करावेत. या कामाचा वेग वाढवून हे मेट्रो मार्गाचे काम विहित वेळेत पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी बुधवारी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी मुंबईत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधीकरण (एमएमआरडीए) कार्यालयात जाऊन मेट्रो अधिकाऱ्यांकडे केली.



कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, शिळफाटा रस्ता ते काटई, कोळे, वडवली, उसाटणेमार्गे तळोजा असा कल्याण – तळोजा मेट्रोचा मार्ग आहे. हे काम आता शिळफाटा रस्त्यावर गोळवली, सोनारपाडा, मानपाडा भागात सुरू आहे. मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर ही कामे शिळफाटा रस्त्याच्या मध्यभागी सुरू आहेत. त्यामुळे मागील दोन वर्षापासून कोंडी मुक्त असलेला शिळफाट रस्ता मेट्रोच्या कामांमुळे दररोज वाहतूक कोंडीत अडकत आहे. मेट्रोची कामे शिळफाटा रस्त्याच्या मध्यभागी सुरू आहेत. या कामांमुळे रस्त्याचा भाग आक्रसला गेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुने अरूंद जागेतून वाहने नेताना चालकांना कसरत करावी लागते. अवजड वाहने मेट्रो कामांच्या ठिकाणाहून जात असताना कोंडीत सर्वाधिक भर पडते. त्यामुळे प्रवाशांची शिळफाटा रस्त्यावरील मेट्रोची कामे लवकर करण्याची मागणी आहे.

मेट्रो मार्गासाठी कल्याण ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित कराव्या लागणार आहेत. बाधित शेतकऱ्यांना त्यांचा भरपाईचा मोबदला वेळेत दिला तर जमिनीचे भूसंपादन करणे अधिकाऱ्यांना सहज शक्य होईल, अशी सूचना आमदार मोरे यांनी अधिकाऱ्यांना केली. याविषयी अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका दर्शवली. कल्याण – तळोजा मेट्रो मार्ग ग्रामीण भागातून जात आहे. त्यामुळे गावच्या गावपणाला धक्का न लागता, ग्रामस्थांच्या मागण्यांचा प्राधान्याने विचार करून हा प्रकल्प कोणताही वाद न होता पूर्ण होईल यादृष्टीने विहित वेळेत पूर्ण करण्यात यावा. या कामासाठी सर्वोतपरी सहकार्य देण्याची तयारी आमदार मोरे यांनी दर्शवली.

या बैठकीच्या वेळी एमएमआरडीएचे उपाध्यक्ष अविनाश मुदगल, अतिरिक्त आयुक्त पद्माकर रोकडे, प्रकल्प अधिकारी बसवराज, डोंबिवली शिवसेना शहर सचिव संतोष चव्हाण, स्वीय साहाय्यक सतिश मोडक उपस्थित होते.

# कल्याण मध्ये याज्ञवल्क्य ऋषी जयंती साजरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण : मंगळवारी श्रीमद् याज्ञवल्क्य ऋषी जयंती निमित्त श्रीराम मंदिर पारनाका कल्याण येथे शुक्ल यजुर्वेद संहिता पारायण आयोजित करण्यात आले होते. यजुर्वेदीय पुरोहित बहुसंख्येने उपस्थित होते. तसेच श्रीराम मंदिर विश्वस्त मंडळ व परिसरातील भक्तगण उपस्थित होते. देशस्थ शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन पुरोहित मित्र मंडळाच्या वतीने सदर कार्यक्रम पार पडला. मंडळ प्रतिनिधि वेदमूर्ती विशाल जोशी, वेदमूर्ती दुष्यंत जोशी, वेदमूर्ती ऋषिकेश श्रोत्री गुरुजी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरता मेहनत घेतली व आभार व्यक्त केले.



## संक्षिप्त

# गॅस पाईपलाइनसाठी निकृष्ट दर्जाचे काम

### खोदकामानंतरच्या धुळीमुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण शहरातील विविध भागात महानगर गॅस पाइपलाइने टाकण्यासाठी मागील २-३ वर्षांपासून खोदकाम सुरू आहे. कल्याण मधील सोसायटी परिसरात अनेक ठिकाणी खोदकाम करून पाइपलाइन टाकल्यानंतर त्यावर पुन्हा वापरण्यात आलेले सिमेंट अतिशय निकृष्ट दर्जाचे व सिमेंट कमी भूसा वापरण्यात आला असून त्यामुळे सोसायटी परिसरात धुळ उडत असून त्यामुळे अनेक नागरिकांना खोकला व घसा खवखवणे असे आजार सुरू झाले आहेत. याबाबत संबंधित व्यवस्थापन व अधिकारी यांना संपर्क केला असता फोन उचलत नाही. नागरिकांच्या तक्रारीनुसार स्फूर्ती फाउंडेशनने कल्याण डोंबिवली महानगरपालिका आरोग्य विभागाकडे याबाबत तक्रार केली परंतु तिकडूनही अजून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. महानगर गॅस पाइपलाइन टाकण्यासाठी खोदकाम करत आहे परंतु हे करत असताना नागरीकांना यांचा त्रास होणार नाही तसेच कल्याण शहरात ठिकठिकाणी खोदकाम मुळे वाहतूक अडचण होत ते काम त्वरित मार्गी लावावे. नागरीकांना गॅस पाइपलाइन सुविधा लवकरात लवकर सुरू करून द्यावी अशी मागणी स्फूर्ती फाउंडेशन अध्यक्ष बजरंग तांगडकर व शिल्पा तांगडकर यांच्या वतीने करण्यात आली आहे.

## आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला चौराहा - एक बहुभाषिक काव्यसंध्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला 'चौराहा - एक बहुभाषिक काव्यसंध्या' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात राज्य शासनातील कार्यरत असणाऱ्या वरिष्ठ महिला अधिकारी कविता सादर करणार आहेत, अशी माहिती एनसीपीएच्या ग्रंथालय प्रमुख डॉ. सुजाता जाधव यांनी दिली. हा कार्यक्रम ७ मार्च रोजी संध्याकाळी ६.०० वाजता नॅशनल सेंटर फॉर द पर फॉर्मिंग आर्टस् (एनसीपीए) येथे होणार आहे.

कार्यक्रमात मुख्य सचिव सुजाता सौनिक, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, मुख्यमंत्री यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए. कुंदन, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टच्या संचालक निधी चौधरी कविता सादर करणार आहेत.

'एनसीपीए'च्या पहिल्या महिला संचालक विजया मेहता यांनी २० वर्षांपूर्वी या कार्यक्रमाची सुरुवात केली असून, ही काव्यसंध्या ऐतिहासिक साहित्य उपक्रमाच्या पुनरुज्जीवनाचे प्रतीक ठरणार आहे. 'एनसीपीए'च्या "पेज टू स्टेज" या उपक्रमाचा एक भाग म्हणून, साहित्याला मंचावर सादर करण्याच्या संकल्पनेतून 'चौराहा' पुन्हा नव्या रुपात प्रेक्षकांसमोर येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# अंतोदय कार्ड धारकांना होळी सणाची गोड भेट

## मुरबाड तालुक्यातील ९ हजार ३८७ महिलांना साडी वाटप होणार!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ९ हजार ३८७ अंतोदय शिधापत्रिका धारक कुटुंबाना होळी सणाला प्रतिकुटुंब एक साडी मोफत देण्यात येणार आहे त्यामुळे तालुक्यातील महिलांच्या शिमगोत्सवाचा गोडवा वाढणार आहे. त्यामुळे महिला वर्गामध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे. मुरबाड तालुक्यातील महिलांना साडी वाटप करण्यासाठी साड्यांचे गठ्ठे पुरवठा विभागाकडे दाखल झाले आहेत एका गटात शंभर साड्या असून त्यांचे वजन ४९ ते ४६ किलो इतक्या दरम्यान आहे. अंतोदय पत्रिका धारक कुटुंबाच्या यादीनुसार साड्यांचे गट्टे तयार करून रास्त भाव दुकानाच्या नावानुसार पोहोचवण्यात येणार आहेत. अशी माहिती

> होळी सणाच्या पार्श्वभूमीवर रास्त भाव दुकान पर्यंत विविध वेळेत साड्या पोहोचतील याची खबरदारी घेतली जाणार आहे. तसेच साड्यांचे वाटप ई-पॉस मशीनद्वारे करण्यात येणार आहे
> – संयोगिता पवार, पुरवठा निरीक्षण अधिकारी,मुरबाड तहसील कार्यालय.

मुरबाड तहसील कार्यातील पुरवठा निरीक्षण अधिकारी संयोगिता पवार यांनी दिली आहे. या साडी वाटपाची जबाबदारी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने घेतले आहे लवकरच स्वस्त धान्य दुकानातून ई -पॉस मशीन द्वारे त्यांचे वाटप करण्यात येणार आहे.होळी सणापूर्वी मात्र लाभार्थ्यांना साड्या वाटप करण्याचे पुरवठा विभागाचे नियोजन आहे. विविध सण, उत्सवाच्या निमित्ताने दारिद्र रेषाखालील अंतोदय शिधापत्रिका धारक कुटुंबातील महिलांसाठी भेट देण्याची योजना राज्य शासनाने अमलात आणली आहे. विधानसभा निवडणुकीत आचारसंहितेच्या कालावधीत ही योजना थांबविण्यात आली होती पण निवडणुका नंतर आता राज्य सरकारने महिलांसाठी पुन्हा ही योजना सुरू केल्याने ग्रामीण भागातील महिला वर्गामध्ये मोठ्या प्रमाणात आनंदाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# निरंकारी भक्तांनी केले रक्तदान




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


कल्याण : संत निरंकारी मिशनच्या सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन रविवारी जगन्नाथ शंकर शेट म्युनिसिपल स्कूल, ग्रँट रोड येथे करण्यात आले. या शिबिराचा उद्देश हा संदेश देणे होता की, "रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नाही," आणि यामुळे सर्वांना रक्तदानासाठी प्रेरित करणे.

सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल ब्लड बँक, भायखळा आणि संत निरंकारी ब्लड बँक, विले पार्ले यांनी या शिबिरात रक्त संकलन केले. निरंकारी भक्त, सेवादल स्वयंसेवक यांच्यासह परिसरातील नागरिकांनीही रक्तदान केले, त्यामुळे एकूण 215 रक्त युनिट्स रक्त संकलित करण्यात आले. संत निरंकारी मिशनच्या स्वयंसेवकांनी सादर केलेल्या नुक्कड नाटकाच्या माध्यमातून रक्तदानाविषयी जनजागृती करण्यात आली. या नाटकातून "रक्तदान सर्वोत्तम दान आहे" हा महत्त्वपूर्ण संदेश दिला गेला. यामुळे प्रभावित होऊन कुंभारवाडा येथील इतर रहिवाशांनी देखील रक्तदान शिबिरात सहभागी झाल्या.

या शिबिराला पर्यटन, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सदिच्छा भेट दिली. पोलीस निरीक्षक उगले देखील उपस्थित होते. तसेच, संत निरंकारी मिशनचे संयोजक हकीम सिंह, कुंभारवाडा शाखा मुखी विनोद थापनिया यांच्यासह अनेक वरिष्ठ व्यवस्थापक आणि सेवादल अधिकारी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# केडीएमसी क्षेत्रात नालेसफाईची कामे लवकर मार्गी लावणार





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाक्षेत्रातील प्रभागनिहाय मोठ्या नाल्याची पावसाळयापूर्वी पावसळयानंतर सफाई कामासाठी केडीएमसीच्या 10 प्रभागनिहाय मोठ्या नाल्याच्या सफाई साठी तब्बल 4 कोटी 29 लक्ष 80 हजार 846 रू कामाच्या निविदा प्रसिद्धी झाल्याने सन 2025-2026 मोठ्या नालेसफाई कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. दरवर्षी नाले सफाईच्या निविदा प्रक्रियेला उशीर होत असतो यामुळे नालेसफाईची कामे सुरू होण्यास विलंब लागतो. या तुलनेत यंदा निविदा लवकर प्रसिद्ध करण्यात आल्याने नालेसफाईची कामे लवकर मार्गी लागणार असे चिन्ह दिसत आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील महत्वाच्या मोठया नाल्यांची सन २०२५ - २६ मध्ये सफाई करण्याच्या कामासाठी प्रभागक्षेत्र निहाय निविदा मगाविण्यात आल्या असून या निविदा मागविताना अटी शर्ती व विशेष बाबी अंतर्भुत करण्यात आल्या असून यामध्ये पूर्ण वर्षभर काम करावं लागणार असून तीन टप्प्यात देयक देऊन वर्षांच्या शेवटी उर्वरित देयक अदा केले जाणार आहे. एकुण रक्कम ४ कोटी २९ लाख ८० हजार ८४६ इतक्या खर्चाची तरतूद प्रभागनिहाय मोठ्या नालेसफाई करण्यासाठी करण्यात आली आहे.

मोठ्या नाल्यांच्या सफाइच्या ठेक्यासाठी पलिका वर्तुळात ठेकेदारांमध्ये स्पर्धा लागते. यामुळेच 18ते 28टक्के बिलो जात मोठ्या नाले सफाईची काम मिळण्यासाठी स्पर्धा होते. दरवर्षी मोठ्या नालेसफाईची पोलखोल पहिल्या पावसात दिसून येते. तक्रारीचे निराकरण करण्यात आणि मोठे नालेसफाई दौरा आणि तु तू में या मध्ये मोठ्या नालेसफाई ची कामे करून घेण्यात प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागते. ठरविक एजन्सी आपली मोनोपाली कायम ठेवण्यासाठी कार्यरत असताना दरवर्षी दिसते. परंतु दंडात्मक कारवाई आणि कामचूकार पणाचा ठपका असलेल्या एजन्सी उजळ माथ्याने निविदा प्रक्रिया पार पाडित आपल्या एजन्सीला काम मिळवून घेतात.

यंदाच्या मोठ्या नालेसफाई कामासाठी प्रशासनाने विशेष अटी शर्तीत घालून लगाम लावलेला दिसून येत आहे. यामध्ये 15 जून पर्यंत 80 टक्के काम अपेक्षित आहे. 15 ऑक्टोबर पर्यंत 90 टक्के काम तर 31 मार्च पर्यंत 100 टक्के काम असा टप्पा अटी शर्ती नुसार निविदेमध्ये टाकण्यात आला आहे. या टप्प्यानुसारच देयक अदा केले जाणार आहे.

दरम्यान याबाबत केडीएमसी घनकचरा व्यवस्थापन उप आयुक्त अतुल पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, निविदा प्रक्रिया पार पडल्यानंतर एप्रिल च्या पहिल्या आठवड्यात प्रभाग निहाय मोठ्या नाल्यांच्या साफ सफाई कामाला प्रत्यक्ष पणे सुरुवात होईल असे सांगितले.

# अट्टल गुन्हेगारास शिताफीने अटक




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण :पेण तालुक्यातील काश्मीरे गावात वारंवार घरफोडी व चोरीचे गुन्हे घडत होते रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांनी सदरचे गुन्हे उघडकीस आणण्यास पेण पोलिसांना सूचना दिल्या होत्या.५ फेब्रुवारी रोजी फिर्यादी सौ संगीता खंडू पाटील वय. ४४ रा. कश्मीरे ह्या व त्यांचे पती घराला लॉक लावून बाहेर गेले असता त्यांच्या बाथरूमची खिडकी उपकवून काढुन त्यांच्या घरात प्रवेश करून त्यांच्या घरातील सोफ्यामध्ये ठेवलेले एकूण ३ लाख ७४ हजार ३०० रुपये किंमतीचे ऐवज माल घरफोडी चोरी झाले बाबत पेण पोलीस स्टेशनमध्ये कलम ३३१ (३), ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास उप विभागीय पोलीस अधिकारी, पेण गजानन टोम्पे यांचे मार्गदर्शनाखाली व पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या सूचनेनुसार गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी पोसई समद बेग व अंमलदार हे करीत होते त्यांनी घटनास्थळाच्या सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी करून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून आरोपी हरिश्चंद्र उर्फ गुड्डु बाळकृष्ण म्हात्रे वय २७ रा. काश्मीरे, पेण यांस १४ फेब्रुवारी २०२५ रोजी अटक करण्यात आली, सदर आरोपीने वरील गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असुन चोरीस गेलेले 19.2 तोळ्याचे सोने हस्तगत करण्यात पेण पोलिसांना यश आले आहे. आरोपी यास ऑनलाईन रम्मी जुगार खेळण्याचे व्यसन जडल्याने, मोहापायी सदरचे गुन्हे केल्याचे तपासा दरम्यान उघड झाले. सदर कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी पोसई समद बेग, सहायक फौजदार राजेश पाटील, पोह. संतोष जाधव, राजेंद्र भोनकर, प्रकाश कोकरे, सुशांत भोईर, अजिंक्य म्हात्रे, सचिन व्हस्कोटी, अमोल म्हात्रे, पोशी गोविंद तलवारे यांनी केला असून सदर गुन्ह्याचा प्राथमिक तपास सपोनि निलेश रजपूत, प्रतीक पोकळे यांनी केलेला आहे.पेण पोलिसांच्या या कामगिरी बद्दल पेण तालुक्यातून लोकांच्या चांगल्या प्रतिक्रिया येत आहेत.

> पेण पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

# 'माझी शाळा, माझी भाकरी' स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण : कल्याण पश्चिमेतील भाऊराव पोटे माध्यमिक विद्यालय येथे 'माझी शाळा, माझी भाकरी' या उपक्रमांतर्गत भाकरी बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा मंगळवारी सकाळी शाळेच्या पटांगणावर संपन्न झाली. या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः चुलीवर भाकरी बनविली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दत्तकृपा एज्युकेशन ट्रस्टचे बिपिन पोटे आणि आगरी-कोळी कलाकार रश्मिता टावरे उपस्थित होते. माझी शाळा माझी भाकरी या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सुंदर भाकरी बनवल्या. त्याचबरोबर मिरचीचा ठेचा, टोमॅटो मिरचीची चटणी, लसणाची चटणी, खोबऱ्याची चटणी आणि विविध प्रकारच्य चटणी तयार केल्या होत्या. विद्यार्थ्यांनी ज्वारीची, तांदळाची भाकरी बनवल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक सुरेश वामन यांनी दिली.

आपल्या देशात स्त्री-पुरुष समानता आहे. कधीकधी पुरुषाला देखील स्वयंपाक करावा लागतो. एखादा विद्यार्थी शिक्षणासाठी बाहेर गेला तर त्याला स्वयंपाक बनवता आला पाहिजे. बाहेरचे जेवण महागडे असते. त्यामुळे, घराच्या जेवणाला तोड नसल्याने हा उपक्रम मुख्याध्यापक सुरेश वामन आणि अन्य शिक्षकांच्या सहकार्याने राबविण्यात आल्याची माहिती बिपीन पोटे यांनी दिली.

# जप्त वाहनांचा ई-लिलाव : इच्छुकांनी प्रक्रियेमध्ये भाग घ्यावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : मोटार वाहन कर न भरलेल्या वाहनांना मुंबई मोटार वाहन कर अधिनियमांतर्गत जप्त करण्यात आले आहे. जप्त केलेल्या वाहनांच्या वाहन मालकांना थकीत कर भरणा कळविण्यात आल्यानंतर देखील वाहन मालकांनी कर भरलेला नाही. अशा एकूण 44 वाहनांचा ई-लिलाव दि.7 एप्रिल 2025 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00 यावेळेत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल येथे होणार असून सर्व इच्छुकांनी ई-लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घ्यावा, असे आवाहन कराधान प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल जयंत चव्हाण यांनी केले आहे.

ई लिलावाच्या तारखेपर्यंत थकीतदारांना कर भरण्याची संधी राहील, याची वाहनाच्या मालकांनी, ताबेदारांना, वित्तदात्यांनी लिलावाचा दिनांकापर्यंत या कार्यालयात थकीत कर, पर्यावरण कर शासकीय दंडाच्या रकमेचा भरणा करून वाहने सोडून द्यावीत किंवा लिलावात हरकत घ्यायची असल्यास दि.19 मार्च 2025 पर्यंत लेखी हरकत घ्यावी. तद्नंतर आपले काही म्हणणे नाही असे गृहीत धरून वाहनांचा लिलाव हा ई-लिलाव पदध्दतीने करण्यात येईल. ई-लिलाव होणाऱ्या वाहनांची यादी कार्यालयाच्या सूचना फलकांवर माहितीसाठी लावण्यात आली आहे. इच्छुकांनी वाहनांची प्रत्यक्ष पाहणी दि.24 मार्च 2025 रोजी सकाळी 11 ते सायंकाळी 6 पर्यंत वाहन अटकावून, जप्त असलेल्या ठिकाणी संपर्क करावा. अधिक माहितीसाठी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल येथे संपर्क साधावा.

# ग्रुप ग्रामपंचायत गणेशपुरीने उभारली आधुनिक व्यायाम शाळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी ग्रुप ग्रामपंचायत व जिल्हा क्रीडा विभाग अधिकारी ठाणे यांच्या मार्फत येथील नागरिकां साठी अत्याधुनिक व्यायाम शाळा उभारण्यात आली असून या व्यायाम शाळेचे उदघाटन ग्रामपंचायत चे सरपंच संदीप खिराडे यांच्या हस्ते करण्यात आले.

गणेशपुरी ग्रामपंचायत चे सरपंच संदीप खिराडे व उपरपंच श्याम जत्तन यांच्या अथक परिश्रम व पाठपुरावा यामुळे सदर अत्याधुनिक अशी व्यायाम शाळा उभारण्यात आली. त्याचा उदघाट्न सोहळा आज मोठ्या दिमाखदार सोहळयात



पार पडला. यावेळी या ग्रामपंचायत चे ग्रामविकास अधिकारी प्रमोद भोईर यासह माजी उपसरपंच प्रमोद जाधव, कृपाली पाटील आदी सह सर्व ग्रामपंचायत सदस्य पदाधिकारी, तसेच परिसरातील गुरुदेव सिद्धपीठ आश्रम चे शिवप्रसाद राऊत, प्रसाद चिकित्सा संस्थेचे मिलिंद नारगुंद, या सह भिमेश्वर सद्गुरू नित्यानंद संस्थेचे अपर्णा पाटील, स्वामी नित्यानंद भक्त रामचंरण नाईक, स्वामी नित्यानंद मंदिराचे मुख्य पुजारी रमेश सुलाखे, नंदू महाराज,तसेच पोलीस पाटील लक्ष्मण हाडळ आदिसह सह ग्रामस्थ मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांना व्यायामाचे महत्व समजावे आणि आरोग्य सुदृढ राहावे, या दृष्टीकोनातून उभारण्यात आलेल्या व्यायामशाळेचा फायदा नक्कीच गावातील तरुण पिढीला होईल. या जिममध्ये व्यायामासाठी आधुनिक पद्धतीचे साहित्य ग्राम पंचायतीने उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे गावातील जास्तीत जास्त युवकांनी व महिलांनी या व्यायाम शाळेचा उपयोग केला पाहिजे व याचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी उपस्थितांनी केले.तसेच या जिम मध्ये ज्या देणगीदारांनी मोठ्या प्रमाणात देणगी रूपाने साहित्य सामुग्रीस मदत केली अशा मान्यवराचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील अनेक ज्येष्ट नागरिक, व्यायामपटू, पंचायत कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रम चे सूत्रसंचालन चिंतामण पाटील यांनी केले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024